# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०४/०९/२०१९ रोजी (दि.२८/०८/२०१९ रोजीची तहकूब सभा (का.प.क्र.०२) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक ०४/०९/२०१९ रोजी (दि.२८/०६/२०१९ व दि.२८/०८/२०१९ रोजीच्या तहकूब सभा का.प.क्र.०२) मा.सभापती श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:४० वाजता वंदेमातरम् या गीताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक,(भा.प्र.से.), नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| ०१. | स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ०२. | स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ०३. | स.स.श्री.राजु रामराव शिंदे |
| ०४. | स.स.श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| ०५. | स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान |
| ०६. | स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर |
| ०७. | स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशिद |
| ०८. | स.स.श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| ०९. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| १०. | स.स.श्रीमती सिमा कहानुलाल चक्रनारायण |
| ११. | स.स.श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ |
| १२. | स.स.श्री.नासेर तकिउद्दीन सिद्दीकी |

श्रीमती.शिल्पाराणी वाडकरः मागच्या मिटींग मध्ये श्री.केंद्रे न सांगता सभेला आलेले नव्हते बजेटची मिटींग आहे. हे माहित असुनही ते आले नाही. ते का गैरहजर राहीले त्याचा खुलासा घेण्यात यावा.

मा.आयुक्त : मागील बजेटच्या मिटींगला जे गैरहजर होते त्यांचा खुलासा मागवण्यात आलेला आहे. आणि आता सभेला जे हजर आहेत त्यांनी याचा खुलासा करतील व प्रशासनाला त्यांनी लेखी कळवावे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकरः श्री.केंद्रे साहेबांना फोन केला तर ते कधीच फोन उचलत नाही पत्र त्यांना पाठवले तर ते त्याचे उत्तर सर्वसामान्य सदस्यांना कधीच देत नाही. जे कि त्यांना उत्तर देणे बंधनकारक आहे माहितीच्या अधिकाराखाली शहरातील नागरीकांनी जर त्यांना प्रश्न विचारले तर त्याचे उत्तर देणे त्यांना बंधनकारक आहे. मग आम्ही या संस्थेचे ट्रस्टी असताना जर ते आम्हाला याचे उत्तर देत नसतील तर सर्वसामान्य जनतेला काय उत्तर देत असतील कुठलेच अधिकारी उत्तर देत नाही. श्री.भोंबे साहेब सुदधा त्यांना सर्व नगरसेवकांचे फोन उचलायला सुचना करावी.

मा.आयुक्त : मी एक सक्युर्लर काढला आहे की स्थायी समीतीला मा.सभापती मॅडम यांच्या पुर्वपरवानगी शिवाय कुठलाही अधिकारी गैरहजर राहता कामा नये. तसेच जी.बी.मध्ये कुठलेही अधिकारी मा.महापौर यांच्या पुर्वपरवाणगी शिवाय गैरहजर राहता कामा नये. आणि इथे जे सर्व अधिकारी उपस्थित आहेत त्यांनी पण याची नोंद घ्यावी. आणि श्री.केंद्रे यांनी खुलासा दयावा.

मा.सभापती : सर्व अधिकारी हजर असावेत. प्रत्येक मिटींगमध्ये याची अमलबजावणी करण्यात यावी.

मुख्य लेखाधिकारी (श्री.केंद्रे): दिनांक २८ रोजी माझी तबेत बरोबर नव्हती मला चक्कर येत होती. मला शुगरचा त्रास आहे माझी शुगरची ट्रीटमेंट चालु आहे चक्कर आल्यामुळे मला मिटींगला उपस्थित राहणे शक्य झाले नाही. त्यामुळे मी दिलगिरी व्यक्त करतो मनापासुन आणि निश्चितपणे भविष्यात परवाणगी शिवाय गैरहजर राहणार नाही. याची काळजी घेतो.

श्री.राजु शिंदे : मला अशी माहिती आहे कि त्या दिवशी तुम्ही अस्थापना संकल्प रिसर्च सेंटर येथे बैठक घेत होतो तिथे तुमचे काम चालु होते. तुम्हाला घाम येत होता. तर तुम्ही आम्हाला मेडीकल सर्टफिकेट दयावे की तुम्ही होता म्हणुन तिथे नाही तर आम्ही पुरावे देतो की तुम्ही रिसर्च सेंटरला बसलेले होते चुकीचे बोलू नये.

मुख्य लेखाअधिकारी (श्री.केंद्रे): मी त्या दिवशी घरी विश्रांती घेत होतो. २८ तारखेला कुठेही गेलो नाही. बाहेर जाण्यासारखी परिस्थिती नव्हती. मी माझे सहकारी अधिकारी लेखाअधिकारी संजय पवार यांना मेसेज केला होता माझी प्रकृती ठिक नाही आपण स्टॅन्डींग अटेंन्ड करावी. आणि तो मेसेज देखील आपण पाहु शकता मी प्रामाणीकपणे बोलतो आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: श्री.पवार साहेब त्या दिवशी उपस्थित होते त्यांनी उत्तर तर मांडलेच नाही पण त्यांनी तुमचा मेसेज सुदधा सभागृहाला कळविला नाही.

मा.सभापती : प्रशासनाला आदेश देण्यात येतो की या पुढे जे स्थायी समीती सभेला गैरहजर राहतील त्यांच्यावर योग्य कारवाई करण्यात यावी.

श्री.राजु शिंदे : धुत हॉस्पीटलचा जो चेक होता मा.आयुक्त साहेबांनी महापौर साहेबांनी सांगुनही तो अजुन मिळाला का नाही मिळाला त्याचा पण खुलासा करावा.

मुख्य लेखाअधिकारी (श्री.केंद्रे): सर याची संचीका माझ्याकडुन पुढे गेलेली आहे.

श्री.राजु शिंदे :तीन लाख चौऱ्यांशी हजार रूपये/ सतरा माणसे तेथे ॲडमिट होते त्यांचे १७ माणसे तेथे दगावले तीन माणसांचा तेथे उपचार झाला त्याच्यामुळे महानगरपालिकेकडुन जर ३,८०,००० जर देणे होत नसेल तर तसे सांगा आम्ही आमचे पैसे जमा करून देऊ त्यांना. एखादया वेळी अशी मोठी घटना जर घडली तर कोणीच आपल्याला ॲडमिट करून घेणार नाही. मागच्या गणपती उत्सवाच्या वेळी काही लोक विहीरीमध्ये पडले होते काही मृत्यू झाले काही हॉस्पीटलमध्ये ॲडमिट होते लोक आपल्या महानगरपालिकेचा कर्मचारी सांगितल्यावर तरी ॲडमिट करून घेतात याच्यानंतर ॲडमिटही करून घेणार नाही एखादा कर्मचारी किंवा एखादा अपघातग्रस्त असेल महापालिकेच्या चुकिमुळे झाला असेल किंवा अन्य कारणामुळे झाला असेल त्याची सुदधा कोणतीही दखल घेतल्या जाणार नाही. आम्ही त्यांना एखादे बिल काढायला थोडीच सांगतो उपचार केलेल्या हॉस्पीटलच बिलं काढायला सांगतोय कमीत कमी बिल दया त्या हॉस्पीटलच अभिनंदन केले पाहिजे पण अभिनंदन तर दुरच राहीले त्यांनी जे काही खर्च केला असेल ते पण आपण देऊ शकत नाही. हे योग्य नाही.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : सन्माननीय सदस्यांना पत्र दिल्यानंतर त्यांनी किती दिवसांमध्ये माहिती दयायला पाहीजे.

अति.आयुक्त :सदस्यांनी पत्र दिल्यानंतर ७ दिवसांत कळविलं पाहीजे.यापुढे दक्षता घेण्यासाठी कळवतो.

श्री.नासेर सिद्दिकी : ज्या विषयावरती माहिती विचारली तीच माहिती दयावी आम्ही माहिती एक विचारतो आणि देतात दुसरीच माहिती मागविण्यासाठी चार वेळा पत्र दयावे लागतात. हे बरोबर नाही.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:जेव्हा बजेटचं पुस्तकं उघडुन बघितलं तेव्हा मला अस वाटलं खरंच हे माझ्या स्वप्नातलं औरंगाबाद शहर आहे निबंध वाचल्यासारखं वाटलं कारण आज सध्या ५ लाख रूपयांच सुदधा काम होत नाही कोटीच बजेट आहे आणि त्याच्यामध्ये वर्कआर्डर पर्यंत आलेले जे काम कपात झालेले आहे. एजन्सी फिक्सींग काम कपात झालेले आह. कामे होण्यासाठी वसुली करणे खुप गरजेचं आहे. आणि हे वसुली करणे प्रशासणाचे काम आहे आणि आम्ही याच्यासाठी जी मदत लागेल ती मदत सुदधा करायला तयार आहोत हे आम्ही या आगोदर सुदधा जीबी मध्ये सांगितले आहे आणि स्टॅन्डींग कमीटीमध्ये पण सांगितले आहे

आमच्या जर वार्डामध्ये वसुली करायची बाकि असेल तर आम्ही तुम्हाला मदत करायला तयार आहे पण तुमच्या कडुन कुठतरी ते प्रशासन कमी पडतेय कारण हे जे आकडे आहेत ते पुर्ण फसवणुक करणारे वाटते. आपण शहरामध्ये मुलभुत गरजा सुदधा नागरिकांच्या कमी करू शकत नाही. माझ्या वार्डातील अजुनही कॉन्ट्रॅक्टरचे बिल निघालेले नाही. हे सिनियारिटीच्या हिशोबानी बिले दिली का? माझ्या वार्डामध्ये चार वर्षापुर्वी पाच पाच कोटीचं काम केलेलं बिल अजुनही निघालेलं नाही. आमचे सर्व काम वार्डात अर्धवट आहे आता निवडणुकिला सामोरे जायचे आहे. असा मेसेज नको जायला कि महिला नगरसेविका आहे म्हणून ती सक्षम नाही काम करून घेण्यासाठी पण या प्रशासणामुळे आमची नगरसेविकांची बदनामी होत आहे. आता वसुली जर करायची म्हंटले तर मागच्या वर्षी नगररचना विभागाला २२० कोटी रूपयाचे टारगेट दिले त्यामध्ये फक्त ५५ कोटी रु. वसुली त्यांनी केली. तुम्ही जे आम्हाला पहिल्या मीटींगमध्ये बजेट सादर केले आहे तेव्हा तुम्ही आम्हाला सांगितलं कि किती उददिष्ट पुर्ण करणार आहे. आणि तुम्ही किती या उददिष्टयाच्या जवळ जाणार आहे याचा पण खुलासा करण्यात यावा. आणि हे जे बजेट केले ते कसं उत्पन्न वाढविणार आहे आणि कशी वसुली करणार आहे आणि कसे ते काम पुर्ण करणार आहे.

श्री.नासेर सिद्दिकी : बजेटबुक जेव्हा मी उघडुन बघितलं तेव्हा त्यात काही नाव असे आहे कि काही काम पुर्ण झालेले आहे काही काम असे आहे कि ज्याचे वर्कऑर्डर आहे कॉन्ट्रॅक्टर काम घेऊन उभा आहे ते पण बजेटबुक मधुन काढून घेण्यात आलं आहे हे सर्व काम बजेट बुकमधे समाविष्ट व्हायला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री.कमलाकर जगताप : वार्डातील कामांची वर्कआर्डर झालेली आहे. मागच्या बजेट बुक प्रमाणेच हे बजेट ठेवण्यात यावे.

श्री.राजु शिंदे : रू.२०२०चे कोटीचे बजेट मा.आयुक्त साहेबांनी सादर केले २०२० कोटी रु. बजेट सादर करतांना जे काही उद्दीष्ठे त्यामध्ये ठरवलेले आहे ते उददिष्ट आपल्याकडून पुर्ण होईल कि नाही शंका आहे. सभागृहाला माहीती देण्यात यावी. आणि जे काही आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातुन काम या शहरामध्ये होणार आहे त्याच्यामध्ये वर्कऑर्डर झालेले कामे त्याच्यानंतर इस्टीमेट झालेले टेंडर झालेले आता फक्त तुमच्या सहीला बाकि राहीलेले वर्कऑर्डर देण्याचे असे काम सुध्दा आपण याच्यामध्ये घेतलेले आहे. हे काम आम्हाला इस्टीमेट करून मंजून करून घेणेसाठी फिरावे लागते. नागरिकांना आता आम्ही काय सांगायचं कि आता हे काम आले आहे आणि अशी किती वर्ष महानगरपालिकेमध्ये ही परंपरा अशीच चालु राहणार आहे. गेल्या विस वर्षापासुन मी महानगरपालिकेमध्ये सदस्य आहे कधीच आर्थिक परिस्थिती आणि कामाच बजेट कधीच पुर्ण होत नाही कधीच आपलं उददिष्ट पुर्ण होत नाही. आणि कधीच काम आपले संपत नाही आणि या दोन,तीन गोष्टी जर लक्षात घेतल्या तर ही न थांबणारी प्रक्रिया आहे. किती वसुली करतो आपल प्रशासन किती सक्षम काम करते त्याच्यावर हे सर्व अवलंबुन आहे. आम्हाला जाणीव आहे कि आपल्याकडे तेवढा पुरेसा स्टाफ नाही. आपला आकृतीबंध मंजुर नाही किंवा आपल्याकडे अजुन वेगवेगहया अडचणी आहेत. आपल्याला या सर्व अडचणी वर मात करून हा सर्व विकासाचा गाडा पुढे न्यायचा आहे. त्यामुळे आपल्याला एक विनंती आहे. विकास कामे करावी. शहराचा विकास थांबु नये, आणि असं कोणालाही मान्य होणार नाही नगरसेवकांनाही मान्य होणार नाही. आता काम पाच पाच वेळेस सुदधा रिकॉल करून टेंडर काढून कामे घेतली या वर्षी पुर्ण काम होतील आणि पुढच्या वर्षी आपल्यावर पुर्णच्या पुर्ण बोजा येईल आता १५ दिवसांमध्ये आचारसंहिता लागु होणार त्यामुळे किमान जे वर्कऑर्डर झालेले काम आहे ते तरी काम चालु झाले पाहिजे. जेवढे काम घेतलेले

आहे ते सर्व काम यात ॲड करण्यात यावे. मागच्याच सभेमध्ये मा.मुख्यमंत्र्यांनी सांगितले १०० कोटी खर्च केले तर आम्ही २०० कोटी देऊ. १०० कोटीमध्ये आता हे रोड कमी झाले आहे. जे घेतलेले नाही ते. मला असे वाटते आपण यामध्ये कोणतीही काटछाट करू नये जसे आहे तसे हे पुर्ण मंजुर करावे कशी वसुली करायची आमची काही मदत लागली तर आम्ही मदत करू आम्हाला सांगा कि तुमच्या वार्डामध्ये ऐवढी वसुली आहे. तेथे आम्ही जाऊ तिथे आम्ही त्यांना बोलू आपल्या व्यावसायिक गाळे (शेटर) असतील तीथे आपण भाडे कस मागूण घेता येईल उत्पन्न कसे वाढवता येईल उत्पन्नाचे सोर्स कसे निर्माण होईल. आकृतीबंद जर मंजुर झाले यावर्षी तर त्याचा सुदधा फायदा होईल आणि अधिकारी कर्मचारी सुदधा वसुली करतील. आपण उद्दिष्ट घेतो आणि ते उद्दिष्ट पुर्ण करण्याच्या आगोदरच ते त्या अधिकाऱ्याकडून काढून घेतो ते उददिष्ट पुर्ण होतच नाही. आणि महानगरपालिकेच्या माध्यमातुन आपल्या शहरामध्ये चांगले काम होईल. नविन काम ॲड न करता जे काम आहेत तेच करा. आणि मला अशी विनंती आहे मा.सभापती सर्व सदस्यांचे सर्व काम यामध्ये समाविष्ट करतील अशी अपेक्षा करतो.

श्रीमती.सायरा बानो : जे टेंडर पास झाले होते ते बजेट बुक मध्ये घेण्यात आलेले नाही. ज्या जुन्या कामांची वर्क आर्डर झालेली आहे ते काम आधी पुर्ण करण्यात यावे. मेन्टेंन्सचे कामे करण्यात यावे. बजेटमधील जे नगरसेवकांचे उद्दिष्ठे आहेत ते यामधुन काढुन टाकण्यात आले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ : आत्ताच जी चर्चा सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. त्या चर्चेनुसार जे काही स्पील ओव्हरचे काम या ठिकाणी बजेट मध्ये आलेले नाही ते आयुक्तांनी त्याच्यात मुददामुन घेतलेले नाही का? आयुक्तांनी जर बजेटबुक मध्ये सगळे काम घेतले असते तर चर्चाच झाली नसती. आयुक्तांशी चर्चा झाली पाहिजे. आयुक्तांनशी आपण बोललो पाहिजे. आयुक्तांसमोर आपल्या समस्या मांडल्या पाहिजे. त्याच्यामध्ये बजेटनुसार सिल्वरचे काम त्यांनी घेतलेले नाही असे मला वाटते. या सभागृहामध्ये ऐवढया सगळया बाबी ऐकल्यानंतर १०० टक्के स्पीलच्या कामाचा समावेश या बजेटबुक मध्ये नक्की होणार आहे. कारण या सगळया कामासाठी पैसे कोठून आणायचे हा प्रश्न प्रशासनाकडे आहे. परंतु हा प्रश्न उपस्थित करत असताना वारंवार या महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या बाबतीत या सभागृहात नव्हे तर सर्वसाधारण सभागृहामध्ये सुध्दा चर्चा झालेली आहे. ज्या पद्धतीने आयुक्त स्पीलच्या कामाला या ठिकाणी कात्री लावतात. त्याच पध्दतीने आयुक्तांनी या महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी सुध्दा प्रयत्न केले गेले पाहिजे. जेव्हा आपण या ठिकाणी बजेट स्विकारत आहोत. स्विकारताना नेमके या महानगरपालिकेच्या वार्डनिहाय लोकसंख्या किती आहे. किती पैसे वार्डनिहाय जमा होतात. याची माहिती सुदधा या सभागृहासमोर आली पाहिजे. एखादया वार्डामध्ये जर ९० टक्के कर वसुल होत असेल. आणि त्या ९० टक्के वसुल झालेल्या त्या वार्डामध्ये कामासाठी बजेटबुकचे ५टक्के जर रक्कम ठेवत नसाल तर मला असे वाटते त्यांच्यावर तो अन्याय आहे. कारण ज्या वेळेस माणुस कर भरतो. किमान त्याच्या घराजवळ त्याला तेवढया किमान सुविधा प्राप्त झाल्या पाहिजे. या सभागृहामध्ये स्पीलचे काम आपण घेणार आहोतच आपण तसे आदेशीत करणार आहोतच. त्या आगोदर आपण या सभागृहामध्ये जेव्हा आपण बजेट स्विकारणार आहोत त्यावेळेस प्रत्येक वार्डनिहाय वसुलीची काय पोझीशन आहे. मालमत्ता विभागाकडून आपल्याला किती उत्पन्न प्राप्त होत आहे. आणि महानगरपालिकेचे सर्व उत्पन्न स्त्रोत आहे तेथुन किती उत्पन्न आपल्याला प्राप्त होते. वसुलीच्या बाबतमध्ये प्रशासनाचे काय धोरण आहे. याची सुदधा माहिती दिली गेली पाहिजे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर:सदस्यांनी सांगितले कि ज्या वार्डामध्ये जेवढी वसुली होते. त्या हिशोबाने त्या वार्डामध्ये काम झाले पाहिजे. मी पण त्याला आग्रही आहे ती माहिती सभागृहासमोर आली पाहिजे.

आणि तुम्ही सांगितले कि मागच्या वर्षीपेक्षा या वर्षी वसुली तुम्ही डबल करणार आहे. अधिकाऱ्यांना काहीच फरक पडत नाही. त्यांचे पगार थांबवले तर वसुली करतील.

मा.सभापती : मा.सदस्यांच्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : बजेटची ही मिटींग जी मागे तहकुब झाली होती ती पुढे नेतोय. हे या लोकशाहीचा खुप महत्तवाचा उपांग आहे. प्रशासनाने आपल्याप्रमाणे जे बजेट घेतल्याजाते. आणि स्थायी समिती याच्यावर निर्णय घेत असते. आणि मग ते सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर होत असते. आणि प्रशासनाचे काम यामध्ये शासकिय दृष्टया वाटते. मला याच्यावर खुप विश्वास आहे लोकप्रतिनिधी म्हणुन स्थायी समितीमध्ये किंवा सर्वसाधारण सभेमध्ये जो काही निर्णय घ्याल तो या शहराच्या आणि लोकांच्या हिताचाच असेल. बजेटमध्ये मी खुलासा करू इच्छितो कि बजेट जरी फुगवलेला वाटतो तरी तो फुगवलेला नाही आहे. म्हणजे २०२० कोटीचा जो बजेट आहे. त्याच्यामध्ये मागे पण मी असा खुलासा केला होता. माझी जी प्रस्तावना आहे त्याच्यामध्ये मॅडमनी सांगितल कि कशावरती खर्च होणार आहे. आणि तो निधी कशातून येणार आहे याचा खुलासा करण्यात आलेला आहे. २००० पैकी सुमारे १५०० कोटी खुप मोठा निधी शासनाकडून जे या शहरासाठी खुप वर्षापासुन महत्तवाचे प्रकल्प प्रलंबित होते. ते हाती घेण्यात आलेले आहे. तो कचऱ्याचा प्रकल्प असो किंवा त्याच्यामध्ये नुकतेच ९० कोटी पासुन १४८ कोटी पर्यंत तो वाढला त्याला मा.मुख्यमंत्र्यांच्या लेव्हलवर त्या कमिटीने मंजुर केला. पाणी पुरवठयाची योजना १६०० कोटी ची ती पण आम्हा सर्वाना अशी अपेक्षा आहे कि ती पण लवकरच मंजुर होणार आहे. त्याचा पण निधी या वर्षी खर्च होणार होता. मागील वर्षी १०० कोटीचे जे काम हाती घेण्यात आले. ३० पैकी २० रस्त्याचे काम रस्ते हाती घेण्यात आले. सात रस्ते पुर्ण होण्यावर आहे. मा.मुख्यमंत्री यांनी जी सव्वाशे कोटी देण्याची घोषणा केली होती तो निधी पण आपण गृहीत धरलेला आहे. की आम्हाला नव्याने तो निधी मिळेल. सर्वाचे जर यामध्ये साथ राहीली तर महत्वाचे जे प्रकल्प आहे. जे निम्मे झालेले आहे. ते पुर्ण होतील. कच-याच्या प्रकल्पामध्ये फक्त हर्सुलचा एक प्रकल्प राहीलेला आहे. जो स्थायी समिती समोर आहे माझी विनंती आहे. तो प्रकल्प मंजुर केल्यास आमचा कचऱ्याचा प्रश्न मार्गी लागतो. दुसरा रस्त्यांच्या बाबतीत १२५ कोटी मध्ये ६५ जे मोठे रस्ते आहे. जसे स.सदस्यांनी सांगितलेले कामे घेत असताना ते समावेश करता आला पाहिजे. शासनाच्या निधीतुन मोठे या शहराचे कामे झाले पाहिजे. आणि स.नगरसेवक नागरिकांच्या एकदम जवळचा प्रतिनिधी असल्यामुळे जे काही वार्डाअंर्तगत कामे आहे. ते सर्व म.न.पा. निधीतुन आपल्याला काऊटींग करता आले पाहिजे. हे जर करता आले तर मोठी आणि लहान कामे करणं या शहरामध्ये शक्य होतील. सव्वाशे कोटीचा जो प्रकल्प आहे. त्याचे मी सर्वसाधारण सभेमध्ये प्रेझेंटेशन केले होते. अंदाजे ६५ रस्ते जे महत्वाचे मोठे रस्ते आहेत याची यादी स.सदस्यांशी चर्चा करून सर्वाचे मत घेऊन ते पाठवलेले आहे. याच्यामध्ये सर्वसाधारण सभेमध्ये ६५ पैकी काही रस्ते वाढवले त्याच्यामुळे तो थांबवलेले आहे. तो जर मंजुर करता आला तर तो प्रस्तावणेमध्ये मंजुर होईल. आम्हाला हे काम करण्यासाठी वसुली वाढवावी लागेल. आणि अधिकारी पण लागतील आज एक एक अधिकाऱ्याकडे तीन तीन चार्जेस आहे. आम्ही न्यु बॉम्बे, पुणे, या सिटी चा अभ्यास केला. इथे एका एका डिपार्टमेंटमध्ये पन्नास पन्नस अधिकारी असतात. आमच्याकडे पाच,पाच असतात तर हे जे आकृतीबंधचा मागिल एक वर्षामध्ये अभ्यास करण्यात आलेला आहे. ते जर मंजुर झाला तर या कार्पोरेशन सशक्त होईल आणि तेवढीच वसूली वाढेल. लोकप्रतिनिधी म्हणून जिथे जिथे महिलांचे प्रमाण वाढलेले आहे. तिथे तिथे विकासाचं प्रमाण वाढलेले आहे. असं एक संशोधन आहे. त्यामुळे मी या गोष्टीचा पुर्ण सर्मथक आहे. जितक्या महिला लोकप्रतिनिधी

म्हणून येतात. तितकाच प्रत्येक पातळीवरती विकास होणार. याच्यानंतर स्पीलच्या कामाबद्दल जी चर्चा झालेली आहे ती कामे सर्वसामान्य सदस्यांनी त्यांना आवश्यक वाटल्यास त्या त्या भागामध्ये आदेश देऊन ते घेण्यात आलेले आहे. ते कुठल्यातरी स्टेज वर येऊन थांबलेले आहे. बिलोक्रेसीमध्ये घेतल्यानंतर त्याला वेळ लागतो आणि ती प्रोसिजर चेंज व्हावी म्हणून आपण एक बजेट मांडला होता. प्रत्येक गोष्टीमध्ये एमान्डार आणि कॅपिटल वर्क्स असे वेगवेगळे बजेट मांडलेले आहे. एमान्डार म्हणजे बेसिक दुरूस्ती चालवण्यासाठी जी काही आपली मत्ता आहे. ती चालवण्यासाठी तरी किमान आम्हाला ही कामे करावी लागतात. ते पण समप्रमाणात सगळया झोन मध्ये वाटल्या जावे. कचऱ्यामध्ये महसुली खर्च ६३ कोटी आहे. आणि भांडवली खर्च १२३ कोटीचा आहे. तसेच पाण्यामध्ये महसुली खर्च १३२ कोटी भांडवली खर्च ८२० कोटी रस्त्यामध्ये महसुली खर्च २५ कोटी भांडवली खर्च ३५७ कोटी स्ट्रीट लाईट मध्ये महसुली खर्च ६६ कोटी भांडवली खर्च ११ कोटी म्हणजे अंदाजे मागे दोन, तीन वर्षामध्ये देखभाल दुरूस्तीला जेवढा निधी लागतो. तेवढा निधी तशा प्रत्येक एच.ओ.डी ला सुचना केलेला आहे. की आपण झोन वाईज वार्ड वाईज वर्षाच्या सुरूवातीलाच टेंडर देखभाल दुरूस्तीचा ताबा दयाल जेणेकरून एसटीपी क्रेज स्टेजचे काही मंजुर केला तर दर वेळेस त्या कामासाठी नवीन टेंडर काढावा लागेल. मग ते आपल्याला तात्काळ हाती घेता आले पाहिजे. सिस्टम सुधारावे लागेल. सभागृहामध्ये सुचना मांडण्यात आल्या आहे. आणि व्यक्तीगतरित्या मी त्याच्याशी सहमत आहे. वसुली जीथे जास्त होते वसुलीच्या प्रमाणामध्ये तेथे विकासाची कामे हाती घेतले पाहिजे. मी जॉईन्ट झाल्यानंतर पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये मी असे मत मांडले होते की एक धोरणात्मक निर्णय सर्वसाधारण सभेने घ्यावा. आणि त्याच्यामध्ये जे इन्सेन्टीव आहे. म्हणजे वसुली चांगली आहे. आणि कचऱ्याचा जे चांगले व्यवस्थापण जे करतात. जे गार्डनचा चांगला सांभाळ करतात. त्यासाठी स्थायी समीती म्हणून तुम्ही त्याच्यावर निर्णय घेऊ शकता. बजेटची काही टक्केवारी आपण ठरवावी. किमाण २० टक्के निधी आपल्याला म्हणजे एक्झीटींग बजेटचाच तो प्राधान्याने अश्या वार्डमध्ये खर्च केला पाहिजे. त्याचे निषक प्रशासन मान्यतेस्वत सर्वसाधारण सभेमध्ये किंवा स्थायी समिती समोर ठेवु शकतो. सगळीकडे एक समतोलतेने काम झाले पाहिजे प्राधान्याने कुठली कामे घ्यावी. सुचना समोर आली आपण थोडी दुरदृष्टी ठेवुन कामे हाती घेतले पाहिजे. काही वेळेस प्रसार माध्यमांकडून किंवा स.सदस्यांच्या माध्यमातुन असे लक्षात आणुन दिले जाते कि आपण रस्ता करतो मग इतर जोडून कामासाठी रस्ता फोडतो, तर हा पैशाचा अपव्यय आहे. काही वेळेस टप्या टप्याने पण काम हाती घेतले पाहिजे. आपल्या कडे १२० गार्डन आहेत. ३० त्यामध्ये महत्वाचे आहे. काल मी एका ठिकाणी गेलो भव्य असे नियोजन केले होते म्हणजे छोटे ठिकाण आहे पण तेथे चांगल्या लाईटिंग, वॉकिंग ट्रॅक असं जर बजेट केले तर एकाच वेळी ते ७० ते ८० लाख असे बजेट होत तर असे न करता टप्या टप्याने काम करायचे आहे म्हणजे पहिल्या वर्षी ते गार्डन मुलांना खेळण्याइतपत करायचे. दुसऱ्या वेळेस जॉगिंग ट्रॅक करायचे तिसऱ्या वेळी अजुन काही असं करायच म्हणजे प्राधान्यक्रम जर देता आला तर निधी आपल्याला सर्व कामांसाठी पुरेल आणि रिकव्हरिच्या बाबतीत मागे मी सांगितलं होत कि एक एक वर्षात आपण वाढ करत आलेलो आहोत. मालमत्ता कर ६३ कोटी पासुन १०९ कोटी पर्यंत मागील वर्षी गेला या वर्षी २२५ कोटी ठरवतो. पाणीपटटी ४० पासुन मागील वर्षी ५५ कोटी केली आता आपण ८७ गृहीत आहे. नगररचना मध्ये वसूली मागिल वर्षी पेक्षा वाढला पण पाहिजे तेवढा नाही वाढू शकलो. मालमत्ता मध्ये तसेच आहे. पण ते वाढल नाही. १५० पट पर्यंत किंवा १३० टक्के पर्यंत मागील वर्षाच्या रिकव्हरी मध्ये गेलो. पण आपण आता असा विचार करतो पुढे त्याच्या

दुपटीला जाऊ. वार्डतील सर्व कामे व्हावे याच्याशी मी सहमत आहे. आणि मला असे वाटते आपण जर अजुन प्रयत्न लावला तर किमान अजुन १०० कोटी किमान प्रॉपर्टीच्या मालमत्ता मध्ये, टाऊनप्लॅनिंगमध्ये उत्पन्न वाढवले पाहिजे. मला याची खात्री आहे कि स्थायी समीती याच्यामध्ये जो काही निर्णय घेईल तो योग्यच राहणार असेल त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

श्री.राजु शिंदे : एखादया अधिका-याला एखादे टार्गेट देतो. आणि ते टार्गेट पुर्ण होण्याच्या आत त्याची बदली होते. आणि नंतर ते काम होत नाही. हे सर्व प्रकल्प पुर्ण केल्याशिवाय आयुक्तांनी जाऊ नये. लोकांमध्ये अशी प्रतिमा तयार झाली की नगरसेवकच चांगले नाही. तुम्ही खुप चांगले काम करता तुमच्या कामाबद्दल आम्हाला शंका नाही. तुम्ही खुप चांगले प्रोजेक्ट तुम्ही आणले. पण ते पुर्ण होईल कि नाही याची आम्हाला खात्री वाटत नाही. देखभाल दुरुस्तीचे जर वार्ड वाईज टेंडर काढले त्या प्रमाणे प्रत्येक वार्डातले दोन किंवा पाच लाखाचे ड्रेनेजचे काम बघावे. मागच्या वेळी जेव्हा मी चेअरमन होतो, तेव्हा प्रत्येक वार्डाला देखभाल दुरूस्तीसाठी १५-१५ कोटी रूपये दिले होते. आणि ड्रेनेजच काम माहानगरपालिकेच्या फंड मधून केले पाहिजे. पाणिपुरवठयाचं काम समांतर मधुन केले पाहिजे. आणि ती आज गरज आहे शहराची. जेवढे आपल्याला रस्ते करायचे आहे शहरामध्ये ते पुर्णच्या पुर्ण शासनाच्या निधीतुन कसे करता येईल जेणेकरून जी २०० कोटी सव्वाशे कोटीची जी यादी दिली आहे ती ५०० कोटीची दयावी. लहान मोठे सर्व रस्ते आपण त्याच्यामध्ये समाविष्ट करावे. जेणेकरून ज्या सर्व नगरसेवकांनी याच्यामध्ये काम टाकलेले आहे. त्या सर्व कामांना न्याय मिळेल. आपण असे धोरण निश्चित करावे कि समांतर मधले १०० टक्के पाणीपुरवठयाचे काम करू. १०० टक्के रोडचे काम आपण शासनाच्या निधीतुन करू. आणि आत्तापासुनच ५०० कोटीची यादी दयावी. जेवढे काही वर्कऑर्डर झालेले काम असतील, टेंडरची काम असतील, इस्टीमेट झालेले मंजुर असतील हे सर्व काम आपण शासनाच्या निधीमध्ये घ्यावे. आणि ते शासनाला पाठवावे. आणि ते जर झालं तर शासनाचा खुप मोठा भार महानगरपालिकेचा कमी होणार आहे.

श्रीमती सत्यभामा शिंदे : मा.आयुक्तांचे ध्येय-धोरण चांगले आहे. जी काही संचिका निघालेल्या आहे. संचिका मंजुर आहे. टेंडर निघालेले आहे अशा संचिका मंजुर करण्यात याव्या. आम्ही कुठे कमी पडलो हे प्रशासनाने दाखवुन दयावे. सर्व प्रोसिजर पर्यंत येवुन संचिका पुर्ण होत नाही. त्या संचिकेत काय त्रुटी आहे त बघुन लगेच निपटारा झाला पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : मा.आयुक्तांनी जे बजेट सादर केले ते आता पर्यंत पेंडीग आहे. मा.आयुक्तांनी त्यांच्या पध्दतीने बजेट सादर केले आहे. ज्या कामांचे इस्टीमेंन्ट बनवण्यात आले, टेंडर निघाले होते आणि ज्या कामांना अजुन पर्यंत सुरूवात करण्यात आलेली नाही असे कामे बजेटमध्ये समाविष्ठ करण्यात यावे.वस्तुनिष्ठ बजेट ठेवले गेले पाहिजे सर्व वार्डात विकास कामे करावीत अशा पध्दतीने बजेटमध्ये तरतूद करवी हे बजेट दुरूस्तीसह मंजुर करावे.

मा.सभापती :आयुक्त साहेबांनी जे विधान केले. महिलांच्या कामाबद्दल जो विश्वास दाखविला त्याबद्दल मी समाधान व्यक्त करते. आणि सर्व मा.सदस्यांचे जी विकास कामांसाठी तळमळ आहे. त्यामुळे प्रशासनास सुचित करते आज रोजी मंजुर अर्थसंकल्पातील सर्व सदस्यांच्या वार्डातील मंजुर कामे, जसे निविदा कार्यवाही अंतर्गत असलेली कामे, मंजुर अंदाजपत्रके वर्कऑर्डर झालेली कामे, तसेच अर्थसंकल्पात असलेल्या सर्वच कामांना तात्काळ प्रशासकिय मान्यता देण्यात यावी. व सर्वच वार्डातील कामे तात्काळ सुरू होईल याची नोंद घ्यावी तसेच या अर्थसंकसंकल्पात सभापती स्थायी समिति करिता रू.१० कोटीचा अप्तकालीन निधी ठेवण्यात येत आहे. याची नोंद प्रशासनाने घ्यावी. आणि प्रशासनाला सुचित करण्यात येते की वसुलीवर जास्त भर दयावा त्यामुळे विकास कामे आपली

लवकर होतील. प्रशासनाने सादर केलेल्या सन २०१९-२०२० च्या जमा व खर्चाच्या अंदाजावर सर्व स.सदस्यांनी ज्या अभ्यासपूर्वक सूचना मांडल्या असून त्या सूचनांचा विचार करून व सर्व स.सदस्यांच्या वार्डातील विकास कामाविषयीच्या भावना लक्षात घेता व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सादर केलेले सन २०१९-२०२० जमा व खर्चाच्या अंदाजामध्ये दुरूस्ती सूचविण्यात येते. यामध्ये प्रामुख्याने जमा बाजू मध्ये खालीलप्रमाणे वाढ सूचविण्यांत येत आहे.

| लेखाशिर्ष | प्रशासनाचे उद्दिष्ट | स्थायी समितीने सूचविलेली वाढ | एकूण उद्दिष्ट |
|---|---|---|---|
| स्थानिक संस्था कर | ३२५.०० कोटी | २५.०० कोटी | ३५०.०० कोटी |
| मालमत्ता कर | २२५.०० कोटी | १२५.०० कोटी | ३५०.०० कोटी |
| नगररचना विभाग | १५०.०० कोटी | ५०.०० कोटी | २००.०० कोटी |
| मालमत्ता विभाग | १०.०० कोटी | ०५.०० कोटी | १५.०० कोटी |
| अनुदाने व इतर किरकोळ | ५०१.०० कोटी | १००.०० कोटी | ६०१.०० कोटी |
| पाणी पट्टी | ८७.७५ कोटी | ७०.२५ कोटी | १५८.०० कोटी |
| इतर किरकोळ वसूली | | २५.०० कोटी | |

वरील प्रमाणे एकूण वाढीव रक्कमेमधून प्रशासनाकडून सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षातील निधी अभावी राहून गेलेल्या विकास कामांचा समावेश (स्पील ओव्हरची कामे) म्हणुन सन २०१९-२०२० च्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. त्यानुसार प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये वाढ होऊन र.रू. २४२०.५० कोटीच्या अजेच्या व र.रू.२४१९.९५ कोटी खर्च व र.रू.५५.०० लक्ष शिलकिच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते व अंतिम मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यास शिफारस करण्यात येते तसेच प्रशासनाने सादर केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१८-२०१९ सुधारीत अंदाजास सर्वानुमते मान्यता देण्यात येते व लोकसभेची आदर्श आचारसंहिता असल्यामुळे त्या कालावधितील दि.०१/०४/२०१९ पासूनचे सादर केलेल्या लेखानुदानास सर्वानुमते मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रशासनाने सादर केलेल्या जमा व खर्चाच्या मुळ अंदाजावर सर्व सन्माननिय सदस्य यांनी सखोल अभ्यास व चर्चा करुन शहरातील नागरीकांच्या मुलभुत गरजा व त्यांना पुरविण्यात येणाऱ्या आवश्यक सुखसुविधा लक्षात घेता, या अर्थसंकल्पामध्ये सर्व प्रभागात विकास कामे करण्याचा सर्व सदस्यांचा मानस आहे. तथापी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असुन सुध्दा वरील सर्व बांबीचा विचार करुन सन्मानिय सदस्यांच्या प्रभागात नागरी सुविधा पुरविणे व विकास कामे करण्यासाठी जमा बाजुच्या अंदाजामध्ये वाढ सुचविण्यात येऊन देखभाल दुरुस्ती व विकास कामांचा समावेश अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे.

मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये वाढ होणे अपरिहार्य असून या करीता आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी तसेच यासाठी आवश्यक मदत सर्व स.सदस्य यांनी प्रशासनास करावी व उद्दिष्टानुसार वसुलीचे प्रयत्न करावे.

स्थायी समितीच्या वतीने शहरातील सर्व नागरीकांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडील थकीत असलेला व चालु वर्षातील मालमत्ता कर, पाणीपट्टी भरणा करुन महानगरपालिकेने हाती घेतलेल्या मोठ्या प्रमाणावरील विकास कामांस हातभार लावावा. आपल्या सहकार्याशिवाय शहराचा विकास शक्य होणार नाही.

या अर्थसंकल्पात दिव्यांग व्यक्तिंच्या कल्याणकारी योजनांसाठी, तसेच महिला व बाल कल्याण, सफारी पार्क, विशेष रस्ते अनुदान या करिता तरतुद करण्यात आलेली असुन सदरील तरतुद योग्यरित्या खर्च करण्यासाठी विशेष अधिकारी यांची नियुक्ती सदर योजना यथायोग्यपणे राबविण्या करिता करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१८-२०१९ चे सुधारित अंदाज जमा रु.७२४ कोटी ८० लक्ष ५५ हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु.१०६ कोटी ६३ लक्ष २२ हजार असे एकुण जमा रु.८३१ कोटी ४३ लक्ष, ७७ हजार आणि एकुण खर्च रु.७३१ कोटी ३२ लक्ष ४५ हजार विचारात घेता रु.१०० कोटी ११ लक्ष ३२ हजार शिलकीचे सुधारित अर्थसंकल्पास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात येते.

उपरोक्तनुसार प्रशासनाने सादर केलेल्या मुळ अंदाजामध्ये फेर फार, दुरुस्ती व वाढ करुन सन २०१९-२०२० करीता महानगरपालिकेचे मुळ अंदाजपत्रक जमा रु.२२०७ कोटी ६६ लक्ष १० हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक शासकीय अनुदान च्या शिलकीसह रु.२१२ कोटी ८३ लक्ष ९४ हजार असे एकुण रु.२४२० कोटी ५० लक्ष ०४ हजार जमेस अनुसरुन रु.२४१९ कोटी ५० लक्ष ४२ हजार खर्च विचारात घेता रु.९९ लक्ष ६२ हजार शिलकीच्या अर्थसंकल्पास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९६ नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते. तसेच दिनांक ०१ एप्रिल २०१९ ते ३१ जुलै २०१९ या कालावधीतील लेखाअनुदानास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१८-२०१९ चे सुधारित व सन २०१९-२०२० चे मुळ अर्थसंकल्प महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०० अन्वये अतिम मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद